
# पेसा निधी

# पंचायत (अनुसूचित क्षेत्राचा विस्तार) अधिनियम (पेसा)

## अबंधित निधी




- आदिवासींची संस्कृती परंपरा आणि निसर्ग यांचे जतन करण्यासाठी पेसा व वन हक्क अधिनियम कायद्याद्वारे आदिवासी ग्रामसभांना विशेष अधिकार देण्यात आले आहेत.

- या योजनेमार्फत आदिवासी क्षेत्रासाठी विशेष निधीची म्हणजेच ५ टक्के अबंधित निधी तरतूद करण्यात आली आहे.

- आदिवासी समाजाच्या सांस्कृतिक आणि वैशिष्ट्यपूर्ण गरजा लक्षात घेऊन आदिवासींच्या विकासासाठीच हा निधी वापरायचा आहे.

पेसा निधी

# ग्रामपंचायतला निधी वितरित करण्याची पद्धत




- गावाच्या लोकसंख्येनुसार प्रत्येक महसुली गाव व वाडीकरता आदिवासी उपयोजनेतून पाच टक्के निधी ग्रामपंचायतींना अबांधित स्वरूपात देण्यात येतो.
- निधीच्या नियोजनासाठी पेसा कायद्यानुसार ग्रामसभा घेऊन गावात ग्रामसभा कोष समिती स्थापन करायची असते.
- या समितीचा कार्यकाळ पाच वर्षाचा असतो.
- राष्ट्रीयकृत किंवा शेड्यूल बँकेत ग्रामसभा कोष समितीचे वेगळे बँक खाते उघडावे लागते.
- एक महिला, एक पुरुष आणि ग्रामसेवक यांच्या सयुंक्त नावाने हे ग्रामसभा कोष समितीचे खाते असते.
- दरवर्षी आदिवासी विकास विभागामार्फत राज्य पातळीवरून थेट ग्रामपंचायतीच्या खात्यावर निधी जमा केला जातो.
- पाच लाख रुपयाच्या आतील निधी दोन हफ्त्यात तर त्यापेक्षा जास्त निधी तीन हफ्त्यात जमा केला जातो.

पेसा निधी

# ग्रामपंचायतच्या कामगिरीवर आधारित निधी वितरण

- अतिकुपोषित बालकांचे प्रमाण कमी करणे.
- बालविवाहावर बंदी आणणे.
- गावातील ५ ते १५ वयोगटातील शाळेत जाणाऱ्या मुलींचे गळतीचे प्रमाण कमी कमी करणे.
- वनजमिनीवर नव्याने अतिक्रमण थांबवणे.

# निधीची देखरेख ग्रामसभा कोष समिती मार्फत



- दर वर्षी ग्रामसभेमध्ये ठराव व मान्यता घेऊनच निधी खर्च करायचा आणि सर्व आर्थिक व्यवहारावर नियंत्रण व देखरेख ठेवायची.

- ग्रामसभा कोष समितीने विकास कामांसाठी झालेला खर्च, त्यातून केलेले काम व कामाची गुणवत्ता याची मांडणी ग्रामसभेसमोर करायची.

- निधीच्या जमा खर्चाची सविस्तर मांडणी ग्रामसभेत करून प्रत्येक व्यवहाराला ग्रामसभेची मंजुरी बंधनकारक आहे.

- ग्रामसभा कोष निधीतून केलेल्या कामाची माहिती देणारे फलक गावात लावणे बंधनकारक आहे.

- उदा. एखादे बांधकाम झाले असेल तर एकूण सिमेंट, स्टील, विटा, मशनरी, मजुरी इत्यादींवर झालेला खर्च सर्वांना दिसेल अशा ठिकाणी फलकावर लिहिणे.

## पेसा निधी

# निधीच्या वापरासाठी जनजागृती, प्रशिक्षण आणि क्षमता बांधणी

- निधीच्या प्रभावी वापरासाठी ग्रामस्तरावर जनजागृती, विविध गाव समित्यांचे गठन, क्षमताबांधणी, ग्रामसभा कोष समितीचे रेकार्ड व्यवस्थापन, अकाउंट व्यवस्थापन, तांत्रिक सहाय्य संस्थांची निवड, अशा उपक्रमांसाठी पहिल्या वर्षी विशेष तरतूद केली आहे.

- या निधीबाबत बोली भाषेतील माहिती पुस्तिका तयार करून एप्रिल महिन्यातील ग्रामसभेत त्याचे वाचन करणे.


- पेसाचे ग्रामसभास्तरीय प्रशिक्षण स्थानिक पातळीवर आयोजित करणे.

- पंचायतराज दिनाच्या निमित्ताने जनजागृती अभियान घेणे.

- आदिवासी क्षेत्रांमध्ये आदिवासी पाडा परिषद आयोजित करणे.

पेसा निधी

# गावाच्या विकासासाठी नियोजन आराखडा ग्रामसभेने तयार करणे आवश्यक



- दरवर्षी १ मे रोजी होणाऱ्या ग्रामसभेत वार्षिक आराखड्याला मान्यता देणे.

- आराखडा तयार करतांना प्रत्येक गाव व वाडी/ पाड्यावरील लोकांचा विचार घेणे आवश्यक.

- आराखडा तयार करतांना मागील दोन वर्षातील कामांची स्थिती व पुढील वर्षातील गरजा विचारात घेणे आवश्यक.

- ग्रामसभेने मान्यता दिलेल्या कामास स्वतंत्र प्रशासकीय मान्यतेची आवश्यकता नसते.

**पेसा निधी**

# असा करावा निधीचा वापर



- पायाभूत सुविधांसाठी म्हणजे गावतील अंतर्गत रस्ते, ग्रामपंचायत कार्यालय, आरोग्य केंद्र, अंगणवाडी, शाळा, दहन–दफनभूमी, आणि इतर संबंधित कामे
- २५ टक्के निधी– पेसा आणि वन हक्क अंमलबजावणीसाठी
- २५ टक्के निधी– स्वच्छता, आरोग्य, शिक्षण
- २५ टक्के निधी– वनीकरण, वन्यजीव संवर्धन, जलसंधारण, वनतळी, वन्यजीव पर्यटन व वन उपजीविकेसाठी


## निधीच्या खर्चाचे व्यवस्थापन

- या निधीतून प्राधान्याने स्थानिक लोकांना कामाची संधी उपलब्ध करणे. मजुराचा पगार त्याच्या बँक खात्यावर जमा करणे बंधनकारक आहे.
- साहित्य खरेदी किंवा कामाचा ठेका देताना समितीने किमान तीन पुरवठादाराकडून दरपत्रक मागवून ज्या पुरवठादाराचे दर कमी आहेत व मालाचा किंवा सेवेचा दर्जा चांगला आहे त्याला ग्रामसभेने मंजुरी द्यावी.
- गाव पातळीवर कामाला ग्रामसभेची मान्यता घेऊन त्यांची पुढील रजिस्टर्समध्ये नोंद करणे आवश्यक असते.
- ग्रामसभा हजेरी पत्रक, ग्रामसभा कार्यवृत्तांत नोंदवही
- ग्रामसभा कोष सामान्य पावती, गाव मालमत्ता नोंदवही
- कामाच्या मोजमापाची नोंदवही, कामावर लावण्यात आलेल्या मजुरांचा हजेरीपट
- प्रमाणक म्हणजेच व्हाउचर नोंदवही, वस्तू साठा नोंदवही
- आवक जावक नोंदवही
- ग्रामसभा कोषातून हाती घेतलेल्या सर्व कामांच्या खर्चाचे लेखापरीक्षण दरवर्षी करून घेणे बंधनकारक आहे.
- लेखा परीक्षण करण्यात आलेल्या ग्रामसभाकोष समितीलाच पुढील निधी मिळतो.

# पेसा निधी

## दरवर्षी ग्रामसभेमध्ये या चारपैकी एका विषयाची निवड करून ती कामे वर्षभरात पूर्ण करावी.

### प्रत्येक कामासाठी २५ टक्के निधीची तरतूद केली आहे.



- ग्रामपंचायतीमध्ये प्रत्येक गाव आणि पाड्यावर पायाभूत सुविधा निर्माण करणे – पेसा गावातील ग्रामपंचायत कार्यालये, आरोग्य केंद्रे, अंगणवाड्या, शाळा, दहन–दफनभूमी, गोडाऊन, गावंचे अंतर्गत रस्ते व त्या प्रकारच्या पायाभूत सुविधा निर्माण करणे.

- स्वच्छता आरोग्य आणि शिक्षणाचा लाभ गावातल्या प्रत्येकापर्यंत पोहोचवणे – सार्वजनिक स्वच्छतागृहे बांधणे, गावामध्ये स्वच्छता राखणे, सांडपाणी व्यवस्थेकरता गटारे बांधणे व त्याची देखभाल करणे, शुद्ध पिण्याचे पाणी पुरवणे, पोषण कार्यक्रम राबविणे.


- वन हक्क अधिनियम व पेसा कायद्याची अंमलबजावणी करणे – आदिवासींना त्यांच्या उदरनिर्वाहाच्या संदर्भात प्रशिक्षण व मार्गदर्शन करणे, गावतळी विकास, मत्स्यपालन व्यवसाय/ मस्त्यबीज खरेदी, सामाईक जमिनी विकसित करून देणे, गौण पाणी साठ्याचे व्यवस्थापन, सामाईक नैसर्गिक साधनसंपदा व सामाईक मालमत्ता विकसित करणे.

- आपल्या गावाचे जंगल, निसर्ग जलस्रोत याचे संवर्धन करणे, वन्यजीव संवर्धन,

- जलसंधारण, वनतळी, वन्यजीव पर्यटन आणि वन उपजीविका यांचे संवर्धन

# पेसा निधी

# निधी कोणत्या कामांवर खर्च करता येईल




## ✓ निधी कोणत्या कामांवर खर्च करता येईल

- कौशल्यवृद्धी, रोजगार व उत्पन्न वाढ.वैयक्तिक लाभ
- सार्वजनिक सुविधा - जसे भात गिरणी, धान्य बँक
- शिक्षण, आरोग्य, पोषण इत्यादी सेवांचे बळकटीकरण
- दूरसंचार व दळणवळण सुविधांचे बळकटीकरण
- सामुदायिक संसाधनांचे जतन व व्यवस्थापन
- दुर्गम क्षेत्रामध्ये अतिरिक्त सुविधा, कर्मचारी देणे
- छोटे तलाव, गौण खनिजे इत्यादींचे व्यवस्थापन
- सार्वजनिक वन हक्काचे उपक्रम राबवणे
- गौण उपज वस्तूंवर प्रक्रिया व विक्रीच्या सुविधा करणे
- पर्यटन विकासाचे उपक्रम
- नादुरुस्त सुविधांची दुरुस्ती व पुनर्जीवन
- ग्रामपंचायत ग्राम सक्षमीकरण

## ✗ निधी कोणत्या कामांवर खर्च करू नये

- वैयक्तिक लाभ
- इतर योजनाखाली सहज मिळणारा लाभ
- एकूण निधीच्या ४० टक्के पेक्षा अधिक बांधकामासाठी खर्च
- घरांना जोडणारे अंतर्गत रस्ते
- गावाचे प्रवेशद्वार/ कमान, सुशोभीकरण
- गावचे कर संकलन उद्दिष्ट पूर्ण करणे
- ग्रामपंचायतीचे वीज बिल/ देयके भरणे
- लाभार्थी हिश्शाची रक्कम
- धार्मिक सण-समारंभ/उत्सव
- आदिवासी विकासाखेरीज इतर विषय

# पेसा निधी



## तांत्रिक मान्यता आवश्यक असलेल्या १० कामांची यादी

१. सिमेंट नाला बंडिंग

२. भूमिगत गटारे

३. अंगणवाडी, समाजमंदिर इ. बांधकाम

४. शेतीयोग्य जमीन तयार करणे.

५. शेतीकरता जलसिंचन प्रकल्प

६. सौरऊर्जा निर्मिती संयंत्र

७. सिमेंट कॉंक्रीटचे रस्ते, नावीन्यपूर्ण तंत्रज्ञानाचा वापर करून रस्ते बांधणे.

८. मोठ्या गावांकरिता मलनिसा:रण, सांडपाणी प्रक्रिया केंद्र उभारणे.

९. इमारतीचे बांधकाम, साठवणुकीसाठी खोली बांधणे.

१०. पूरनियंत्रण भिंती बांधणे.

११. हिंस्र श्वापदांपासून संरक्षणासाठी भिंत बांधणे.

## तांत्रिक मान्यता आवश्यक नसलेल्या ३२ कामांची यादी

१. गावातील लोकांची क्षमताबांधणी आणि स्थळ पाहणी

२. ई-शिक्षण आणि डिजिटल शिक्षण प्रणाली

३. अंगणवाडी व शाळेमध्ये प्रसाधनगृहे

४. चारा निर्मिती करणे

५. भूमिहीन कुटुंबांना शेळीपालन

६. सामूहिक विवाह सोहळा

७. पाणी मीटर बसविणे

८. प्रौढ साक्षरता, निरंतर शिक्षण

९. ग्रामपंचायत व शाळेमध्ये संगणक बसविणे.

१०. अंगणवाडीमध्ये शालेयपूर्व साहित्य घेणे.

११. अपंगांकरिता वैयक्तिक लाभाच्या योजना

१२. आठवडी बाजारातील सोयी सुविधा

१३. वनराई बंधारा, शेततळे

१४. सामाजिक वनीकरण

१५. मत्स्य व्यवसाय

१६. पिण्याच्या पाण्यासाठी कूपनलिका बांधणे.

१७. अंगणवाडीमध्ये किचन शेड उभारणी

१८. सौरऊर्जेवर आधारित संयंत्र उभारणे

१९. सुधारित बी बियाणे प्रक्रिया, सेंद्रिय खताचे उत्पादन

२०. आरोग्य तपासणी शिबीर, पशुसंवर्धन तपासणी शिबीर आयोजित करणे

२१. अंगणवाडी, शाळा व ग्रामपंचायत कार्यालय आवारात भिंत बांधणे

२२. स्पर्धा परीक्षांबाबत पुस्तके असलेले सुसज्ज ग्रंथालय

२३. गरजू शेतकऱ्यांकरिता शेतीविषयक अवजारांचा सामूहिक वापर.

२४. दुधाळ जनावरांपासून दूध व दुग्धजन्य पदार्थांचे उत्पादन.

२५. बचत गट युवक व कुमारवयीन मुले यांना कौशल्य विकास प्रशिक्षण.

२६. जनजागृती, दवंडी व इतर सूचनांसाठी गावात ध्वनीप्रक्षेपक बसविणे.

२७. प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांना बसण्यासाठी डेस्क, बेंच, शैक्षणिक साहित्य व इतर गोष्टी.

२८. आदिवासी समाजाच्या रूढी, परंपरा व संस्कृतीचे जतन करणे.

२९. जल तलाव, तळी यांची दुरुस्ती व पाण्याचा अनुकूल वापर करणे.

३०. ग्रामसभेचे बळकटीकरण, अभिलेख जतन करणे.

३१. जलशुद्धीकरण, जलप्रक्रिया प्रकल्प राबविणे.

३२. कंपोस्ट खताचे खड्डे, घनकचरा व्यवस्थापन, कचरा गोळा करणे, त्यांची विभागणी करून खत निर्मिती करणे.